

आत्मनिर्भर भारत" अभियानातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 25/09/2025 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 225 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# अजित पवार यांचा मोठा निर्णय!

## राष्ट्रवादीचे सर्व मंत्री, आमदार-खासदार एक महिन्याचा पगार पूरग्रस्तांसाठी देणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व मंत्री, खासदार, आमदार आणि विधानपरिषद आमदार आपला एक महिन्याचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करणार आहेत.

पक्षाचे राज्याध्यक्ष सुनील तटकरे यांनी ही माहिती दिली असून, महाराष्ट्रातील महापुराच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.संकटाच्या या कठीण काळात प्रत्येक नेत्याने महाराष्ट्राच्या जनतेसोबत उभं राहणं गरजेचे असल्याचे तटकरे यांनी सांगितले. दरम्यान, उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी पूर्वनियोजित सर्व कार्यक्रम रद्द करत थेट पूरग्रस्त भागात भेट दिली. आज ते सोलापूर, धाराशीव आणि बीड या जिल्ह्यांना स्वतः भेट देत असून, स्थानिक मंत्र्यांसोबत पूरपरिस्थितीची पाहणी करत आहेत.अजित पवार यांनी आज पीडित नागरिकांशी संवाद साधला आणि प्रशासनाला तातडीने शेतकऱ्यांसाठी मदत देण्याचे निर्देश दिले आहेत.तसेच सर्व राष्ट्रवादीचे मंत्री आणि आमदारांनी आपापल्या भागात मदतीचे काम सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

यासोबतच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने लवकरच आणखी काही मदत योजनांची घोषणा करण्यात येणार असल्याचेही सुनील तटकरे यांनी सांगितले. पक्षाच्या या एकत्रित उपक्रमामुळे पूरग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच शेतकरी, कामगार व सर्वसामान्य नागरिकांसाठी खंबीरपणे उभा आहे असेही ते म्हणाले.

# वीजपुरवठा खंडित होऊ देऊ नका, प्रलंबित कामांना गती द्या

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या महावितरणच्या अधिकाऱ्यांना सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी - शहरातील आकुर्डी, काळभोरनगर, मोहननगर, दत्तवाडी परिसरातील वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. या भागातील वीज पुरवठा तत्काळ सुरळित करावा. नवरात्र उत्सव सुरु आहे. दसरा, दिवाळी सण जवळ आले आहेत. त्यामुळे सणासुदीच्या काळात वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. महावितरणच्या सुरु असलेल्या, प्रलंबित कामांना गती देण्याचे आदेश शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले.महावितरण विद्युत वितरण कंपनीच्या पिंपरी-चिंचवड विभागातील वीज प्रश्नांचा खासदार बारणे यांनी बुधवारी आढावा घेतला. यावेळी पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनील काकडे, गणेश खिंड परिमंडळाचे अधीक्षक अभियंता शहाजी गायकवाड, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुंडे, अतुल देवकर, शिवसेनेचे महानगरप्रमुख राजेश वाबळे, शहरप्रमुख निलेश तरस, माजी नगरसेवक प्रमोद कुटे, संतोष सौंदणकर उपस्थित होते.पिंपरी, चिंचवडमध्ये महावितरणची सुरु असलेली कामे, ताथवडेतील अतिउच्चदाब सब स्टेशन, आरडीएस, एसआयडीबीआय योजना, एएससी, एनपीएसएस, पीएम सूर्यघर योजना, जिल्हा नियोजन समितीमधून सुरु असलेल्या कामांचा खासदार बारणे यांनी आढावा घेतला. खासदार बारणे म्हणाले, शहरातील काही भागात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. महावितरणचे अधिकारी फोन उचलत नाहीत. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करतात. या अधिकाऱ्यांना तत्काळ समज द्यावी. नागरिकांचे फोन उचलून वीजपुरवठ्या संदर्भातील तक्रारी निकाल्या काढाव्यात. आगामी सण, उत्सवांमध्ये वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे निर्देश खासदार बारणे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले. ताथवडे विभागाने मंजूर केलेल्या फिडरच्या कामांना महापारेषणकडून मान्यता घ्यावी.

ही कामे तत्काळ सुरु करावीत. नवीन उपकेंद्र, उपकेंद्रातील जुने ब्रेकर बदलावेत. भूमिगत केबल वाहिन्याच्या कामाला गती द्यावी. नवीन रोहित्र बसवावेत. रोहित्रांची क्षमता वाढवावी.

फिडर पिलर कार्यान्वित करावेत. रोहित्राच्या आजूबाजूस संरक्षक कुंपन बसविण्यात यावे. नवीन लघुदाब, उच्चदाब वाहिन्यांच्या कामाला गती द्यावी.

# पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते आदिशक्ती माता सच्चीयाय देवीची आरती संपन्न

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : पुण्यनगरीच्या वैभवशाली सांस्कृतिक परंपरेत या वर्षी आदिशक्ती माता सच्चीयाय देवीच्या नवरात्री पावन पर्वानिमित्त श्रीमद् भागवत कथा तथा नवरात्री कीर्तन महोत्सव भव्यदिव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे. नाम-ज्ञान-प्रेम-दानाचा संगम घडविणाऱ्या या धार्मिक उत्सवात भक्तीसंगीत, पारायण, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन श्री दगड जीवदया संस्था जवळ,आगम जैन मंदिर समोर, कात्रज,पुणे येथे करण्यात आले आहे. आज पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी मातेचे दर्शन घेऊन पुणेकरांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी श्री सुसवाणीमाता सच्चीयायमाता चॅरिटेबल ट्रस्टचे आयोजक प्रमोद दुगड, मोनल दुगड आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना पोलिस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, पुणेकरांना नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा ,आज दुगड परिवाराच्या निमंत्रणांवरून माता सच्चीयाय देवीची आरती करण्याचा योग आला, मंदिरात येऊन अतिशय प्रसन्न वाटले. दुगड परिवार राबवत असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचेही पोलिस आयुक्तांनी यावेळी कौतुक केले. मोनल दुगड म्हणाल्या, माणिकशेठ दुगड यांनी 35 वर्षांपूर्वी आदिशक्ती माता सच्चीयाय देवीच्या मंदिराची उभारणी केली. येथे नवरात्री मध्ये विविध धार्मिक कार्य करत आहोत, यामध्ये ज्ञानेश्वरी पारायण, स्त्री सूक्त पठण , याशिवाय येथे गोशाला आहे, चारशे हून अधिक गायांचा सांभाळ आम्ही करत असून इतरांच्या आजारी गायींना इथे आणले तरी आम्ही त्यांच्यावर योग्य ते उपचार करतो त्यांची काळजी घेतो, अन्नछत्र 24 तास सुरू असते, आज दुगड यांची चौथी पिढी देवीच्या सेवेत आहे. प्रमोद दुगड म्हणाले, आदिशक्ती माता सच्चीयाय देवीच्या नवरात्री पावन पर्वानिमित्त दरवर्षी विविध धार्मिक उपक्रम आम्ही घेत असतो. यंदाही धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल आहे. आदिशक्ती माता सच्चीयाय देवीच्या नवरात्री पावन पर्वानिमित्त श्रीमद् भागवत कथा तथा नवरात्री कीर्तन महोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करत आहोत. अष्टमीच्या दिवशी महाकुंभ महोत्सव होत आहे, यामध्ये 108 जोडपी हवन करणार आहेत. सर्व उपक्रम गौरव दुगड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याचे प्रमोद दुगड यांनी नमूद केले.

# 'व्हिजन@50' उपक्रमांतर्गत शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर विचारमंथन

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी: पिंपरी चिंचवड महापालिका स्थापनेस २०३२ मध्ये ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने महापालिकेने 'व्हिजन@५० शहर धोरण' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत शिक्षण विभागासाठी पुढील पाच वर्षांचा धोरणात्मक आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने विचारमंथन करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेमध्ये महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी देखील सहभागी होऊन आपले मत मांडले.पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून 'व्हिजन@५० शहर धोरण' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत विविध क्षेत्रातील व्यक्तींशी चर्चा करण्यात येत आहे. शहराचा विकास करताना प्राधान्यक्रम कोणत्या गोष्टींना द्यावा? कोणत्या क्षेत्रांना महत्त्व द्यावे? येथील शिक्षण व्यवस्था कशी असावी? पर्यावरण उत्तम राहावे यासाठी काय उपाययोजना कराव्यात? अशा विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी या उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींच्या कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत. त्याच अनुषंगाने आज महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, प्रथम या संस्थेच्या सह संस्थापक रजिया फरीदा यांच्यासह आकांक्षा फाउंडेशन, सत्त्वा कन्सल्टिंग, संगात, किंडर स्पोर्ट्स, क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया, लीडरशिप इक्विटी, पाय जाम फाउंडेशन, टीच फॉर इंडिया, लेंड अँड हँड, युनिसेफ अशा विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.या कार्यशाळेत पिंपरी-चिंचवड शहरातील शिक्षण क्षेत्राचा सविस्तर आढावा घेऊन, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे डेटा-आधारित विश्लेषण, शालेय बाह्य मुले, शाळांमध्ये राबविलेल्या सर्वोत्तम पद्धतींचे सादरीकरण आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शिक्षण व्यवस्थेतील यशस्वी पद्धती, शिक्षण विभागासाठी प्राधान्यक्रम निश्चित करणे, या क्षेत्रातील नवीन आव्हाने यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेष म्हणजे, महापालिकेतील पाच विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन त्यांच्या शालेय जीवनातील अनुभव आणि भविष्यात शाळांमध्ये पाहायला आवडणारे बदल याबाबत मते व्यक्त केली. डिजिटल साधनांचा वापर वाढवणे, शिक्षक-विद्यार्थी संवाद अधिक प्रभावी करणे, क्रीडा व सर्जनशील उपक्रमांना अधिक महत्त्व देणे, आणि मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता यांसारख्या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांनी भर दिला. कार्यशाळेतून आलेल्या सूचनांच्या आधारे शिक्षण विभागासाठी सर्वसमावेशक, विद्यार्थी-केंद्रित आणि दूरदर्शी धोरणात्मक आराखडा तयार केला जाणार असून, यामुळे पुढील पाच वर्षांत पिंपरी-चिंचवड शहरातील शिक्षण क्षेत्रात एक आदर्श उभा राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# साडे चारशेपेक्षा जास्त महिला कर्मचाऱ्यांचा स्वच्छतेत सहभाग

## कचरा विलगीकरणसह स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यावर देखील दिला जातोय भर

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये देशात सातवा व राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. महापालिकेकडून राबवण्यात आलेली स्वच्छता मोहीम, कचरा विलगीकरण, स्वच्छतेबाबत जनजागृती, आर.आर.आर (रिड्यूस-रियुज-रिसायकल) प्रकल्प तसेच शून्य कचरा प्रकल्प अशा विविध प्रकल्पांमुळे शहराच्या सार्वजनिक स्वच्छतेत उल्लेखनीय बदल घडून आला आहे. या सर्व उपक्रमांच्या यशामागे नागरिकांचा सहभाग जितका महत्त्वाचा आहे, तितकाच सहभाग स्वच्छता कर्मचाऱ्यांचा आहे. यामध्ये महिला सफाई कर्मचाऱ्यांची संख्या साडेचारशेपेक्षा जास्त असून पिंपरी चिंचवड शहराची स्वच्छतेची धुरा सांभाळण्यामध्ये या कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने "स्वच्छ शहर, सुंदर शहर" हे ध्येय गाठण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली शहरात विविध अभिनव उपक्रम राबविले जात आहेत. पिंपरी चिंचवड शहराचा विस्तार मोठा आहे. यामध्ये आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ३२ प्रभाग असलेल्या या शहराची स्वच्छतेची व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे यामध्ये महिला सफाई कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणिय आहे. या महिला कर्मचाऱ्यांकडून सातत्याने नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यास प्राधान्य दिले जाते. निरीक्षकपदावर आठ महिला कार्यरतपिंपरी चिंचवड महापालिकेत आरोग्य विभागात महिला आरोग्य निरीक्षक संतोषी कदम, रश्मी तुंडलवार, स्नेहल सोनवणे, स्नेहल सुकटे, रुपाली साळवे, स्नेहा चांदणे, कोमल फर्डे आणि मलेरिया निरीक्षक रुपाली शेटे या निरीक्षकांनी आपल्या कार्यातून नागरिकांमध्ये जनजागृती करून त्यांना स्वच्छतेची सवय लावण्याचे मोठे काम करीत आहेत. दररोज पहाटेपासून ते रात्री उशिरापर्यंत कचरा संकलन, नालेसफाई, तसेच स्वच्छतेच्या बाबतीत नागरिकांना सहभागी करून घेणे, या सर्व गोष्टींचा भार त्या समर्थपणे उचलत आहेत. स्थानिक स्तरावर कचरा विलगीकरणाबाबत जनजागृती असो वा परिसरातील स्वच्छतेवर नियमित देखरेख असो, या महिला निरीक्षकांचा सहभाग प्रेरणादायी आहे. नागरिकांना जागरूक करण्यासाठी हे निरीक्षक अनेकदा घरोघरी जनजागृती मोहिम राबवतात. तर कधी शाळा, महाविद्यालयांत जाऊन विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगतात. यासर्व बाबींचा पिंपरी चिंचवड शहर स्वच्छतेच्या बाबतीत अग्रेसर ठरण्यात मोठा वाटा आहे.

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूल ला "उडान 3" राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचालित रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर मध्ये केलेल्या डान्स विथ म्युझिक यांच्या वतीने आयोजित केलेल्या "उडान 3" या राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक सह अनेक पारितोषिके पटकावली आहेत.

या स्पर्धेत महाराष्ट्रातून चाळीसपेक्षा जास्त शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी पीसीइटीच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, एस.बी.पाटील पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी आदी उपस्थित होते. एस.बी.पाटील पब्लिक स्कूल, रावेतच्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता चौथी ते सहावी लोककला शैली प्रथम पारितोषिक पटकावले. तर इयत्ता चौथी ते सहावी खुल्या शैलीत द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. तसेच इयत्ता सातवी ते दहावी शास्त्रीय नृत्यात द्वितीय पारितोषिक मिळाले. कला शिक्षक अजय चावरिया यांना सर्वोत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांना मिळालेले यश हे सर्जनशीलता, नृत्यकलेचा सन्मान असल्याचे प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी सांगितले. तसेच त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# आत्मनिर्भर भारत" अभियानातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील

## पिंपरी-चिंचवडमध्ये 'आत्मनिर्भर भारत'अभियानावर भाजपची कार्यशाळा संपन्न

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत





पिंपरी-चिंचवड : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या महत्त्वाकांक्षी घोषणेला प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता पार्टी (भाजप) पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने बुधवारी, २४ सप्टेंबर रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मोरवाडी येथील भाजपच्या शहर कार्यालयात ही कार्यशाळा पार पडली. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या निर्देशानुसार आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला अभियानाचे प्रदेश सहसंयोजक, आमदार विक्रम पाचपुते यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आगामी ९० दिवस चालणाऱ्या 'आत्मनिर्भर भारत'अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करणे हा होता. यामध्ये पक्षाचे धोरण, अभियानाची उद्दिष्ट्ये आणि स्थानिक पातळीवर राबवायचे उपक्रम यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेला शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर नितीन काळजे, प्रदेश सदस्य राजेश पिल्ले, महेश कुलकर्णी, सरचिटणीस विकास डोळस, वैशाली खाडये, मधुकर बच्चे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, अभियान संयोजक राजु दुर्गे, सहसंयोजक राम वाकडकर, राजेंद्र बाबर, गिरीश देशमुख, माजी नगरसेवक सुरेश भोईर बाबासाहेब त्रिभुवन, शैलेश मोरे, माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे, शारदा सोनवणे, आरती चोंधे, निर्मला कुटे, सविता खुळे, भारती विनोदे, अजय पाताडे, राजाभाऊ मासुळकर, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, ॲड. हर्षल नढे, अनिता वाळूंजकर, शिवराज लांडगे, मंगेश धाडगे, धरम वाघमारे, अजित बुर्डे, मोहन राऊत, रामदास कुटे, बिभीषण चौधरी, अजित कुलथे, कैलास सानप, नामदेव पवार, रवींद्र देशपांडे, विजय शिनकर, देविदास साबळे, भूषण जोशी, नंदू भोगले, प्रदीप बेंद्रे, नेताजी शिंदे, संजय पटणी, समीर जावळकर, गोरक्षनाथ झोळ, ॲड. गोरख कुंभार, सुप्रिया चांदगुडे, खंडूदेव कथोरे, प्रीती कामतीकर, अलका पांडे, प्रा. दत्तात्रय यादव, ॲड. पल्लवी विग्ने, महेंद्र बाविस्कर, आकाश भारती, चेतन बेंद्रे, रमेश वाहिले यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, विविध मोर्चे आणि आघाडीचे पदाधिकारी, अभियान संयोजक, माजी नगरसेवक, सर्व १४ मंडल अध्यक्ष आणि प्रत्येक मंडळातील अभियान कमिटीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रदेश सहसंयोजक आमदार विक्रम पाचपुते यांनी 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेचा मूळ गाभा स्पष्ट केला. ते म्हणाले की, "हे केवळ एक सरकारी अभियान नसून, देशातील प्रत्येक नागरिक स्वतःच्या पायावर उभा राहून देशाला आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत बनवण्यासाठी घेतलेली एक सामूहिक प्रतिज्ञा आहे. या अभियानांतर्गत स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणे, रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे आणि देशाच्या आर्थिक विकासात योगदान देणे महत्त्वाचे आहे.

त्यांनी पिंपरी-चिंचवड शहरासारख्या औद्योगिक नगरीसाठी या अभियानाचे महत्त्व विशद केले.शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि अभियानाचे यशस्वी नियोजन करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "ही कार्यशाळा आपल्या सर्वांसाठी एक दिशादर्शक आहे. आपल्याला प्रत्येक वॉर्डात, प्रत्येक गल्लीत जाऊन 'आत्मनिर्भर भारता'ची संकल्पना लोकांपर्यंत पोहोचवायची आहे. स्थानिक कलाकारांना, लघु उद्योजकांना आणि महिला बचत गटांना या अभियानात कसे सहभागी करून घेता येईल, यावर आपण विशेष भर दिला पाहिजे." अभियान शहर संयोजक राजू दुर्गे यांनी आगामी ९० दिवसांच्या कार्यक्रमाची विस्तृत रूपरेषा सादर केली. यामध्ये शहरात ठिकठिकाणी जनजागृती शिबिरे, कार्यशाळा, तसेच 'व्होकल फॉर लोकल'यावर आधारित विविध प्रदर्शनांचे आयोजन करण्याची योजना त्यांनी सांगितले. कार्यशाळेत चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तीनही विधानसभा मतदार संघाच्या संयोजकांनी आपापल्या भागातील कार्याचे नियोजन सादर केले. राम वाडकर यांनी त्यांच्या मतदारसंघात लहान उद्योजकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्याची कल्पना मांडली.

राजेंद्र बाबर यांनी युवावर्गाला कौशल्य विकासासाठी प्रोत्साहन देण्यावर भर दिला.गिरीश देशमुख यांनी शेतीपूरक व्यवसायांना आणि ग्रामीण भागातील उद्योगांना मदत करण्याचे ध्येय सांगितले. या कार्यशाळेच्या माध्यमातून 'आत्मनिर्भर भारत'अभियानाला पिंपरी-चिंचवडमध्ये गती मिळाली असून, येत्या काळात त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुणे महापालिकेकडून निवडणुकीसाठी 23 विशेष कक्ष

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : आगामी महापालिकेच्या निवडणुकीची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली आहे. यासाठी २३ विशेष कक्षांची स्थापना करण्यात आली असून या कक्षांसाठी संबंधित अधिकारी नेमण्यात आले आहेत. नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यांनी तत्काळ कामाला सुरुवात करावी, असे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत.महापालिकेच्या निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रभाग रचनांबाबत आलेल्या हरकती आणि सूचनांवर सुनावणी पूर्ण झाली आहे. सुनावणी घेऊन याबाबतचा अहवाल सनदी अधिकारी व्ही. राधा यांनी नगरविकास विभागाकडे सादर केला आहे. पुढील महिन्यात प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे.

त्यानंतर निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर होणार आहे.महापालिकेची आगामी निवडणूक जानेवारी महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. प्रभाग रचना ६ ऑक्टोबर पूर्वी अंतिम होऊन त्यानंतर प्रभागांचे आरक्षण निश्चित होणार आहेत. निवडणुकीसाठी सर्वच पक्षात इच्छुकांची तयारी सुरू झाली आहे.

निवडणुकीसाठी राजकीय घडामोडींना वेग आलेला असताना आता महापालिका प्रशासनाने देखील तयारी सुरू केली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579